# ई - पोलीस पत्रिका

दि २६/१२/२०२२ अनु.क्र. २३७

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

**भाग-१**

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

**१. पोआअ/पशा-१/रजा पोलीस अधिकारी/१५२०५/२०२२ अमरावती शहर दिनांक २८/१२/२०२२**

## -: आदेश :-

अमरावती शहर या पोलीस घटकातील खालील नमुद पोलीस अधिकारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधीत **अर्जीत रजा मंजुर** करण्यात येत आहे.

| अ. क्र | पोलीस अधिकारी यांचे नाव व पदनाम | नेमणुकीचे ठिकाण | रजेचा प्रकार | कालावधी | कार्यभार सांभाळणार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोउपनि/ मोहन राजुसकर | विशेष शाखा | अर्जित रजा | दिनांक ०२.०१.२०२३ ते दिनांक २१.०१.२०२३ पर्यत २० दिवस | - |

**२. पोआअ/पशा-१/प्रशिक्षण/MPA/१५१८७/२०२२ अमरावती शहर दिनांक २७/१२/२०२२**

**संदर्भ :-** संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचे पत्र क्रं. मपोअ/प्रशि-५/सेवा. प्रशि/२०२२/ १०३८६ दि. २९.११.२०२२

**विषय :-** - Police Station Management या विषयावरील प्रशिक्षणाबाबत**.**

## आदेश

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात येते की, **महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक** येथे आयोजित प्रशिक्षणाकरीता अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद पोलीस अधिकारी यांची त्यांचे नावासमोर दिलेल्या प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात येत आहे.

| Sr. no. | NAME OF COURSE | PLACE AND PERIOD | NAME OF OFFICER & POSTING | RANK | MOBILE NO | E-MAIL ID | SEVAARTH NO |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Police Station Management | MAHARASHTRA POLICE ACADEMY NASHIK **28.12.2022 to 30.12.2022** | JYOTI BALEGAVE P. St- Nagpuri Gate AMRAVATI CITY | PSI | 9545490046 | jyotibalegave@gmail.com | DGPJRBF8902 |

उपरोक्त पोलीस अधिकारी यांना त्यांचे सोबत प्रत्येकी रु. ६०००/- या /- (अक्षरी- रुपये सहा हजार फक्त) इतकी रक्कम प्रशिक्षण निधी मध्ये अनुदान शिल्लक नसल्याने तात्पुरत्या स्वरुपात **पोलीस कल्याण निधीमधुन मंजूर** करण्यात येत आहे.

**३. पोआअ/पशा-१/अवलंबित्व प्रमाणपत्र/सपोनि-सोनोने/१५०५०/२०२२ अमरावती शहर दि. २३/१२/२०२२**

## प्रमाणत्र

यावदारे प्रमाणित करण्यात येते की, सहायक पोलीस निरीक्षक/श्री. सुमेध चंद्रमणी सोनोने, नेमणुक - पो. स्टे. सिटी कोतवाली, अमरावती शहर यांना वैद्यकीय देयक प्रतिपुर्तीच्या प्रयोजनार्थ, त्यांचे आई-वडील हे त्यांच्यावर अवलंबुन असल्याचे सत्यापन सादर केले असल्याने सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक वैखप्र-2017/प्र.क्र.614/राकावि-2, दिनांक 2 ऑगष्ट 2019 मधील तरतुदीनुसार त्यांना त्यांचे **वडील श्री. चंद्रमणी सुखदेव सोनोने, व आई श्रीमती उमा चंद्रमणी सोनोने** हे त्यांचेवर अवलंबित असल्याबाबत चे अवलंबित्व प्रमाणपत्र देण्यात येत आहे. व तशी नोंद त्यांचे सेवापुस्तकामध्ये घेण्यात येत आहे.

**४. पोआअ/पशा-१/पोउपनि-मंजुशा ढोले/हजर/१५०५२/२०२२ अमरावती शहर दि. २३/१२/२०२२**

## -: आ दे श :-

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक:- पोमसं/५/१०/पोउपनि-सार्वत्रिक बदल्या/२०२२/३३/२०२२ दिनांक ०९/१२/२०२२ अन्वये खालील नमुद पोलीस उपनिरीक्षक यांची त्यांचे नावासमोर नमुद घटकामधुन या आस्थापनेवर बदली करण्यात आलेली आहे

त्या अनुषंगाने खालील नमुद पोलीस उपनिरीक्षक हे अमरावती शहर घटकांत त्यांचे नावासमोर नमुद दिनांकास बदलीवर हजर झाले आहेत.

| अ. क्र | आदेशातील अ.क्र. | पोलीस उपनिरीक्षक यांचे नाव | पूर्वीचे नेमणुकीचे ठिकाण व कार्यमुक्त दिनांक | अमरावती शहर येथे बदलीवर हजर झाल्याचा दिनांक व नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | १९ | श्रीमती मंजुषा लक्ष्मण ढोले | पोलीस अधिक्षक, अमरावती ग्रामीण, कार्यमुक्त दि.१७/१२/२०२२, पो.स्टे. लोणी. | अमरावती शहर येथे हजर दिनांक २१/१२/२०२२ म. पुर्व नेमणुक- सी.एम.सी. |

महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (पदग्रहण अवधी) मधील नियम १४ अन्वये **श्रीमती मंजुषा लक्ष्मण ढोले, पोलीस उपनिरीक्षक** ह्या पो. स्टे. लोणी, अमरावती ग्रामीण हे नेमणुकीस असल्याने, त्यांना पो. स्टेशन लोणी येथुन दिनांक १७.१२.२०२२ रोजी बदलीवर रवाना केले आहे. पोउपनि/ ढोले ह्या दिनांक १८.१२.२०२२ ते दिनांक २४.१२.२०२२ पर्यंत पदग्रहण अवधी उपभोगुन दिनांक २५.१२.२०२२ रोजी या आस्थापनेवर हजर होणे आवश्यक होते. परंतू सदर अधिकारी हे त्यापुर्वीच **दिनांक २१.१२.२०२२** रोजी या आस्थापनावर म. पुर्व कर्तव्यावर हजर झाले. त्यामुळे त्यांचा उर्वरित पदग्रहण कालावधी एकुण ४ दिवस त्यांचे आर्जित रजा खाती जमा करण्यात येईल.

**श्रीमती मंजुषा लक्ष्मण ढोले,** पोलीस उपनिरीक्षक यांना या घटकात बदलीवर हजर करुन घेण्यात येत असुन त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी तात्पुरती स्वरुपात पुढील आदेशापर्यत नेमणुक करण्यात येत आहे. त्यांनी नेमणुकीचे ठिकाणी तात्काळ हजर होऊन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**५. पोआअ/पशा-१/नाव-बदल/पोउपनि-जढाळे/१५०४७ /२०२२ अमरावती शहर दि. २३/१२/२०२२**

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग दोन - नाव, वय व धर्म बदलण्याच्या जाहिरातींचा विभाग, च गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट 25-31,2022 मधील क्रमांक N-2218500

**विषय** :- नावात बदल करुन सेवापुस्तकात नोंद घेणेबाबत.

## आदेश

श्री. राजु रामकृष्ण जढाळे, पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक पो. स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर यांनी संदर्भीय शासन राजपत्रामध्ये त्यांचे नावात खालिल प्रमाणे बदल करुन घेतला आहे.

| अ.क्र. | पुर्वीचे नांव | बदल केल्यानंतर नविन नांव |
|---|---|---|
| 1. | राजु रामकृष्ण जढाळे | **राजेंद्र** रामकृष्ण जढाळे |

तरी उपरोक्त प्रमाणे पोउपनि/ राजु रामकृष्ण जढाळे यांचे सेवापुस्तकात त्यांचे नावात बदल करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्यांच इतर अभिलेखावर सुध्दा सदर पोलीस अधिकारी यांचे नांवात झालेल्या बदलाप्रमाणे सुधारीत नोंद घेण्यात यावी.

**६. पोआअ/लेखा/घबाअ-नादेय प्रमाणपत्र/१५०५९/२०२२ अमरावती शहर दि. २३/१२/२०२२**

**ना-हरकत प्रमाणपत्र**

**कश्रेलि/निशिगंधा प्रेमानंद देवतळे** सध्या नेमणुक पोलीस आयुक्त, कार्यालय अमरावती शहर हया प्रशासकीय बदलीने पोलीस अधिक्षक, कार्यालय यवतमाळ येथुन पोलीस आयुक्त, कार्यालय अमरावती शहर या आस्थापनेवर दि.१५/०९/२०२१ रोजी हजर झाल्या असुन त्यांना या आस्थापनेवर दि.१५/०९/२०२१ ते दि.२३/१२/२०२२ या कालावधीत शासकीय घरबांधणी अग्रीम मंजुर करण्यात आलेला नाही, करीता **ना-हरकत प्रमाणपत्र** देण्यात येत आहे.

**७. पोआअ/आस्था-१/स्वेच्छा सेनि रद्द /सपोउपनि-११९७/१४६९७/२०२२ अमरावती शहर दि. १२/१२/२०२२**

**संदर्भ** :-१. सपोउपनि/११९७, गजेंद्र गंगाधर पाडेकर यांची स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस दि.१२.१०.२०२२

२. या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/आस्था-१/स्वेसेनि सपोउपनि-पाडेकर/१४२२२/२०२२, दिनांक २८.११.२०२२

३. सपोउपनि/११९७, गजेंद्र गंगाधर पाडेकर यांनी स्वेच्छा सेवानिवृत्ती मागे घेण्याबाबत दिलेला अर्ज दि.३०.११.२०२२

## आदेश

वरिल संदर्भीय पत्रान्वये पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवर कार्यरत असलेले पोलीस अंमलदार **सपोउपनि/११९७, गजेंद्र गंगाधर पाडेकर, नियंत्रण कक्ष, अमरावती शहर** यांनी दिनांक १२.१०.२०२२ रोजी शासकीय सेवेतुन स्वेच्छा सेवानिवृत्त होण्यास परवानगी देणेबाबत नोटीस दिलेली होती. त्याअनुषंगाने त्यांनी पुर्णपणे विचार करून नोटीस दिली आहे किंवा नाही याची खात्री करण्यासाठी त्यांना दिनांक २५.११.२०२२ रोजी आज्ञांकीत कक्षेत बोलविण्यात आले असता, त्यांनी शासकीय सेवेतून स्वेच्छेने सेवानिवृत्त होण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केल्याने त्यांना या कार्यालयाचे संदर्भीय आदेशान्वये दिनांक १२.०१.२०२३ पासून स्वेच्छा सेवानिवृत्त होण्यास परवानगी देण्यात आली होती.

परंतु, त्यांनी दि. ३०.११.२०२२ रोजी दिलेल्या अर्जानुसार त्यांचे कुटूंबाचे व मुलींचे पुढील शिक्षणाचे कारणास्तव स्वेच्छा सेवानिवृत्ती मागे घेण्याची विनंती केल्याने, तसेच त्यांनी विंनती ही इच्छित तारखेपुर्वी केल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम ६६ (५) च्या तरतुदीप्रमाणे **नोटीस मागे घेण्याची परवानगी देण्यांत येत आहे.**

त्यांना अशीही समज देण्यांत येते की, भविष्यात पूर्व विचाराअंती स्वेच्छा सेवानिवृत्ती करिता अर्ज करावा. यानंतर अर्ज मागे घेण्याची परवानगी देण्यांत येणार नाही याची नोंद घ्यावी.

**८. पोआअ/आस्था-१/मुदतपुर्व बदली/१४९०९/२०२२ अमरावती शहर दि. १६/१२/२०२२**

**संदर्भ** :- १. शासन निर्णय, गृह विभाग, क्र.न्यायाप्र ३११५/प्र.क्र.८८/पोल-३, दि.०१.०७.२०१५
२. सन २०१५ चे महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.२ दिनांक १६.०२.२०१५ व त्यावरील पो.म.सं. म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र.पोमसं/३/अधिसुचना/१४/२०१४/७३, दि.२५.०२.२०१५
३. महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्र.२/२०१४, दि.१६.०२.२०१५

## आदेश

उपरोक्त संदर्भात नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश २०१५ मधील नियम २२ न च्या तरतुदीनुसार सक्षम अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून खालील पोलीस अंमलदार यांची त्यांनी केलेल्या विनंतीवरून सामान्य पदावधी पुर्ण होणेपुर्वीच **मुदतपुर्व बदली** त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र | पदनाम | बक्कल क्रमांक | अंमलदाराचे नांव | सद्याची नेमणूक | बदलीचे नविन ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोशि | ४५५ | सचिन हरीभाऊ मकेश्वर | मोपवि | दंगा नियंत्रण पथक |
| २. | पोशि | ५१३ | गोपी पदम यादव | पोलीस मुख्यालय | शहर वाहतूक शाखा |
| ३. | पोशि | ४९२ | निवृत्ती सदाशिवराव वडे | पोलीस मुख्यालय | बीडीडीएस |

**९. पोआअ/आस्था-१/मुदतपुर्व बदली/१३९३५/२०२२ अमरावती शहर दि. १६/१२/२०२२**

**संदर्भ :-** १. शासन निर्णय, गृह विभाग, क्र.न्यायाप्र ३११५/प्र.क्र.८८/पोल-३, दि.०१.०७.२०१५

२. सन २०१५ चे महाराष्ट्र शासन अध्यादेश क्र.२ दिनांक १६.०२.२०१५ व त्यावरील पो.म.सं. म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र.पोमसं/३/अधिसुचना/१४/२०१४/७३, दि.२५.०२.२०१५

३. महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश क्र.२/२०१४, दि.१६.०२.२०१५

## आदेश

उपरोक्त संदर्भात नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम (सुधारणा) अध्यादेश २०१५ मधील नियम २२ न च्या तरतुदीनुसार सक्षम अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून खालील पोलीस अंमलदार यांची त्यांनी केलेल्या विनंतीवरून सामान्य पदावधी पुर्ण होणेपुर्वीच **मुदतपुर्व बदली** त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र | पदनाम | बक्कल क्रमांक | अंमलदाराचे नांव | सद्याची नेमणूक | बदलीचे नविन ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोशि | १४१ | योगेश बाबूलाल पवार | जलद प्रतिसाद पथक | गुन्हे शाखा |

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रति,

पत्रव्यहार शाखा / सेवापट नोंदणी लिपीक / सीसीटीएनएस